# <u>जाहीरात</u>

१. अर्जदार हा महाराष्ट्र शासनाच्या महसुल सेवेतून सेवा निवृत्त झालेला वर्ग-१ किंवा वर्ग-२ किंवा बांधकाम विषयक किमान शाखा अभियंता दर्जाचा तांत्रिक अधिकारी असावा.

२. सदर अधिकाऱ्याची नेमणुक हि कंत्राटी तत्वावर चार महीने इतके कालावधी करीता करण्यांत येईल

३. सदर अधिकाऱ्यास मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांचे निर्देशानुसार वाशिम जिल्हया अंतर्गत जिल्हा परिषद/पंचायत समिती यांच्या मालकीच्या मालमत्ता दस्त ऐवजानुसार शोधणे, त्या मालमत्तांची नोंद विहीत केलेल्या नोंदवहीत घेणे, सदर मालमत्ता जि.प.च्या मालकीची असल्याने जि.प.वाशिम यांच्या नावाची नोंद सातबारावर करणे, जि.प.व पं.स. यांच्या मालकीच्या मालमत्तांचे सर्वेक्षण करणे, जि.प.व पं.स.च्या मालमत्ता शासन दरबारी नोंदी शासन निर्णयानुसार पुर्ण करुन घेणे, जि.प. व पं.स.च्या मालकीच्या मालमत्तावर झालेल्या अतिक्रमणाचा अहवाल सादर करणे व अतिक्रमण काढण्याच्या कार्यवाहीस प्रक्रिया पार पाणे संदर्भात सहाय्य करणे इत्यादी कामकाज करावे लागेल

४. सदर कंत्राटी अधिकाऱ्यांस शासन निर्णयानुसार से.नि.अधिकाऱ्यांस देय असणारे मानधन अदा करण्यांत येईल.

५. सदर कंत्राटी अधिकाऱ्यास जिल्हा परिषदेकडून एक सहाय्यक उपलब्ध करुन देण्यात येईल तसेच अहवाल तयार करणे, दस्तऐवजाची पडताळणी करणे याकरीता जिल्हा परिषदेमध्ये तात्पुरता कक्ष उपलब्ध करुन देण्यांत येईल.

६. सदर कंत्राटी अधिकाऱ्यास मुख्य कार्यकारी अधिकारी/अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांचे नियंत्रणात कामकाज करावे लागेल.

७. सदर कंत्राटी अधिकारी यांचे नियुक्ती नंतर त्यांना प्रतिदिन कामाचे अहवालाबाबत रोजनिशी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना सादर करणे आवश्यक राहील, रोजनिशीनुसार त्यांचे कामाचे मुल्यमापन करण्यांत येईल.

८. सदर कंत्राटी अधिकाऱ्याचे नेमणुकीचा कालावधी कमी/अधिक करण्याचा अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांना राहील.

९. सदर कंत्राटी अधिकाऱ्याचा नेमणुक कालावधी पुर्ण झाल्यानंतर पुन्हश्च कायम स्वरुपी किंवा कंत्राटी स्वरुपाची नेमणुक मागण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही.

१०. सदर कंत्राटी अधिकाऱ्यांस नेमणकीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर रु.१००/- चे स्टँप पेपरवर अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांचे समवेत अटी व शर्तीसह करारनामा करुन दयावा लागेल.

११. या जाहीरातीच्या अनुषंगाने योग्य उमेदवार प्राप्त न झाल्यांस पुन्हश्च जाहीरात देऊन अर्ज मागविण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांचेकडे असेल.

१२. सदर कंत्राटी अधिकाऱ्यांस नेमणुक दिल्यानंतर कोणत्याही कोणत्याही कारणाशिवाय नेमणुक रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम यांचेकडे असेल.

सदर जाहीरातीच्या अनुषंगाने इच्छुक उमेदवारांनी जिल्हा परिषद वाशिम यांच्या संकेत स्थळावर दिलेले नमुना प्रपत्र डाऊनलोड करुन सदर प्रपत्रात आवश्यक ती संपुर्ण माहीती भरुन दिनांक १५/०१/२०२१ पर्यंत कार्यकारी अभियंता (बां) जिल्हा परिषद, वाशिम सादर करावे. दिनांक १५/०१/२०२१ रोजी प्राप्त उमेदवाराचे अर्ज तपासुन उमेदवारांना दुपारनंतर प्रत्यक्ष मुलाखतीस बोलाऊन निवड करण्यांत येईल.

निवडी बाबत कोणत्याही प्रकारचे आक्षेप नाकारणे/स्वीकृत करणे चा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखुन ठेवला आहे.

कार्यकारी अभियंता (बां)
जिल्हा परिषद वाशिम

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद वाशिम

# अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे नाव | :- | ---------------------------------------------------- |
| २ | उमेदवाराची शैक्षणिक पात्रता | :- | ---------------------------------------------------- |
| ३ | उमेदवाराचा से.निवृत्ती पुर्वी धारण पदाचा तपशिल | :- | ----------------------------------------------------<br>----------------------------------------------------<br>---------------------------------------------------- |
| ४ | उमेदवाराची महसुल/बांधकाम क्षेत्रात झालेली सेवा | :- | ---------------------------------------------------- |
| ५ | उमेदवाराने से.निवृत्तीनंतर खाजगी शासकिय विभागात सेवा दिली असल्यास तपशिल | :- | ---------------------------------------------------- |
| ६ | उमेदवाराचे सेवा निवृत्तीचे वेळेस मुळे वेतन व वेतनश्रेणी | :- | ---------------------------------------------------- |
| ७ | उमेदवाराची सदर पदावर काम करतांना अपेक्षीत मानधन | :- | ---------------------------------------------------- |
| ८ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | :- | ----------------------------------------------------<br>----------------------------------------------------<br>मो.क्रं------------------------------------------- |

सहपत्र :- १) उमेदवाराच्या सेवेचे प्रमाणपत्र २) शैक्षणीक अर्हता प्रमाणपत्र ३) सेवा निवृत्ती आदेशाची प्रत ४) से.नि.वेळेचे शेवटचे वेतनाचे प्रमाणपत्र ५) सेवा निवृत्ती वेतन प्रमाणपत्र ६) वाशिम जिल्यांत रहिवाशी असल्याचे प्रमाणपत्र

दिनांक :-

उमेदवाराची सही